।। श्री सद्गुरु प्रसन्न ।।

ज्ञानामृतं भोजनम् ।

# पाझर अमृताचा

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

◈ वर्ष ८ वे ◈ अंक २ रा ◈ ज्येष्ठ -आषाढ-श्रावण - भाद्रपद शके १९३३ ◈ २ जून २०११ ते २७ सप्टेंबर २०११

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा, उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**

## अंतरंग

◆ **Good Behaviour**
- श्रीसस माधुरीनाथ ०३

◆ भक्तगाथा - ०८

◆ गोजिरवाणी -
सौ. नीता कुलकर्णी १०

◆ अहो ऐकलंत का? -
- सौ. मेघा ११

◆ विकाराकडून निर्विकाराकडे
- मुक्ता १२

◆ तरूणाई
- आकांक्षा १४

◆ हे गुपित कुणाला सांगू कसे? -१५
- अनामिका

◆ गुंजारव - १ - २
- अदिती, अपर्णा १६

◆ उत्सव विशेष - १९

**Good Behaviour** - श्रीसस माधुरीनाथ

# वैश्विक एकात्मतेकडे नेणारा एक मार्ग... सदाचरण

**सद्‌गुरू** - अशाप्रकारे प्रबोध म्हणजे दुसरे काही नाही. परंतु जगन्नियंत्याच्या दृष्टीकोनातून पुनर्रचित केलेला बोधच आहे. प्रबोधाला **तत्पदशोधन** किंवा **विश्वात्माब्रह्मैक्य** असेही म्हणतात. त्यातील मूलभूत विचार 'हरी ॐ तत्सत्!' असा मांडल्या जातो. कारण आणि उत्पत्ति महाकारण देहाविषयीचा तुझा प्रश्न सजीव सृष्टी मी तुला समजावल्यावर क्षणार्धात सुटेल. इथे मी तुला सुचकतेने एवढेच सांगतो, मूलाज्ञान म्हणजे ईश्वराचा तिसरा देहच, या दोन्ही देहांच्या उद्‌भवास कारण होतो. जेव्हा आपण परब्रह्माच्या बाजूने ईश्वराकडे पहातो तेव्हा त्याचा ज्ञानदेह आपण पाहू शकतो. म्हणजेच परमात्मरूप (शिव) पाहू शकतो आणि जेव्हा ईश्वराकडे स्थूळदेहाच्या बाजूने आपण पाहतो तेव्हा त्याचा अव्याकृत हा कारणदेह पाहू शकतो. म्हणजेच ईश्वराचे **जगन्नियंता** रूप पाहतो. परंतु हे नीट लक्षात ठेव ते वेगळे नाहीत.

आता **हिरण्यगर्भ** जरी अवर्णनीय असला तरी थोडक्यात असे वर्णन करू शकतो की ब्रह्मांडाच्या स्थूळ देहातील सर्व ज्ञात आणि अज्ञात शक्तींचा समूह, ईश्वरीसंकेत म्हणजे दुसरे तिसरे काही नसून सजीव आणि निर्जीव वस्तुंमुळे निर्माण झालेल्या दृश्य आणि अदृश्य वस्तूच्या बलाचे (शक्ती) परिणामी बल (शक्ती). अशाप्रकारे सर्व सूक्ष्म देह, देवता, भूते, गुरुत्वाकर्षणीय बले, प्रकाश, उष्णता, विद्युत, अणुऊर्जा वगैरे सर्व वस्तुमानरहीत चमचमत्या तेजस्वी शक्तींचा समावेश हिरण्यगर्भामध्ये होतो आणि विश्वाला नियंत्रित करणारा तो अक्स ठरतो (चमचमते सुवर्णासारखे असल्यामुळे). म्हणूनच त्याला **हिरण्यगर्भ सूत्रात्मा** हे नाव आले.

आता परत सजीव सृष्टी निर्मितीच्या आपल्या मुद्द्याकडे वळू. विद्याशक्ती आणि



अविद्याशक्ती या परस्पर विरूद्ध आणि समान बलामध्ये घुसळण होऊन भोवऱ्यांत कार्बन, ऑक्सिजन, हायड्रोजन, फॉस्फरस, आयोडिन, हायमीन, गेनीन, सायटोसीन वगैरे सारख्या अणूपासून पेशीतील (DNA, RNA) गुणसूत्रे स्प्रिंगसारख्या आकाराची निर्माण झाली. गुणसूत्रे दिसायला तंतूसारखी असतात आणि पेशींचे जीवनकार्य (गुणधर्म) ते ठरवतात. तो जीवनस्त्रोत असतो, तो कधी मरत नाही. परंतु सुमारे दोन महिन्यांच्या कालावधीत पेशी मात्र मरतात. अर्थात् पेशी परत जन्माला येतात. पेशीद्रव्य, पेशी छिद्र, पेशी केंद्र आणि या सर्वांना एकत्रित बांधणारी पेशी भित्तिका या सर्वांचा एकपेशीय देह बनतो. (निर्मितीतील) पुनर्निर्माणातील विविध आकारांच्या आणि आकारमानाच्या सातत्यामुळे आपल्याला असे वाटते सजीवांचे देह तेच आहेत परंतु तसे नसते. अगदी तुझा देहही धारावाहिक बदलांतून जात असतो. परंतु हा बदल मानवी चक्षूंच्या क्षमते बाहेरचा असल्यामुळे सर्वसामान्य माणूस असा विचार करतो की मी भौतिक स्थूळदेहच आहे, देह माझाच आहे आणि तो माझ्या कल्पनेप्रमाणे किंवा माझ्या इच्छेप्रमाणे कार्यरत असावा. परंतु तसे घडत नाही. प्रत्येक पेशीतील गुणसूत्रे त्या एकपेशीय **देहाचे भवितव्य** ठरवितात. सूक्ष्मदर्शिकेच्या सहाय्याने पेशीतील ही गुणसूत्रांची जोडी (DNA, RNA) पहाता येते. परंतु आधुनिक शास्त्राच्या सहाय्याने **परब्रह्मतत्त्वाचा** अगदी अंदाजही बांधता येत नाही, जे बोधातील आत्मसाक्षात्काराच्या वेळी तू अनुभवले आहेस, ''**ते तू आहेस.**'' पेशी जीवशास्त्राच्या पुस्तकातून संदर्भ घेऊन कोणी एखादा हे पाहू शकतो. पेशी जीवशास्त्र या विषयाचा सखोल अभ्यास हा आपला उद्देश नाही. एकपेशीय देहाच्या रचनेचा उद्‌भव अशा प्रकारे झाला परंतु ती स्वयंचलित नव्हती. मी तुला पूर्वी समजविल्याप्रमाणे ईश्वर थोडा थांबला आणि परब्रह्म या रचनेला धारण करते झाले. त्यामुळे ते एकमेकांत मिसळले नाही. अगदी अशाच प्रकारे अवयवसंघात किंवा पेशीसंघात तयार होऊन परब्रह्माने तो धारण केला. म्हणजेच ज्यावेळी त्या रचनेला 'मी' म्हणणारी स्फूर्णा परब्रह्मातून उठली तेव्हाच ती रचना

सजीव ठरली. इथे मी तुला सूक्ष्मदेहाच्या तक्ता क्र. २ ची आठवण देतो. तुला असे दिसेल की पहिल्या रांगेत पहिल्या रकान्याखाली लिहिले आहे, '**अंत:करण, जीव, ज्ञातृ**' याचा अर्थ असा, '**अज्ञानवशात देहमोहाने कार्यरत**' अंतःकरण म्हणजेच जीव आणि **असंग निराळेपणाच्या जाणीवेसहित असलेले अंत:करण म्हणजे ज्ञातृ!** तुला ट्रक ड्राइव्हरचे उदाहरण आठवते का? ट्रक आणि केबिन असले तरीही ड्राइव्हर असल्याशिवाय ट्रक धावणार नाही. अगदी त्याचप्रमाणे स्थूळदेह आणि सूक्ष्मदेहही असला तरी देहाला मी म्हणणारी स्फूर्णा (जीवनस्त्रोत) त्यात असल्याशिवाय तो सजीव ठरणार नाही.

**शिष्य-** पण महाराज, मानवी सूक्ष्मदेह कसा तयार झाला?

**सद्‌गुरू-** भोवऱ्यात तीन गुण आणि पंचमहाभूते होती. सर्व भूतांच्या सत्त्वांशाने अंतःकरण पचंक तयार झाले. म्हणजेच आकाशतत्त्वाच्या सत्त्वगुणापासून **अंत:करण**, वायुतत्त्वाच्या सत्त्वगुणापासून **मन**, तेज तत्त्वाच्या सत्त्वगुणापासून **बुद्धी**, आपतत्त्वाच्या सत्त्वगुणापासून **चित्त** आणि पृथ्वीतत्त्वाच्या सत्त्वांशापासून **अहंकार** तयार झाले. सत्त्व, रजाच्या मेळातून पंचमहाभूतापासून प्रवेशद्वारे म्हणजेच अनुक्रमे **श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण** तयार झाले. पंचमहाभूतांच्या रजांशापासून **पंचप्राण** तयार झाले. रजतमाच्या मेळापासून पंचमहाभूतापासून निर्गमनद्वारे अनुक्रमे **वाणी, हस्त, पाद, शिस्न, गुदा** ही तयार झाली. पंचमहाभूतांच्या तमोगुणापासून उपभोगण्यासाठी **पंचविषय** अनुक्रमे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे तयार झाले. अशाप्रकारे सूक्ष्म देह तयार झाला.

आधुनिक शास्त्रात दिलेले, एकपेशीय सजीव देहाच्या जन्मानंतर उत्क्रांतीने आजची सजीव सृष्टी कशी निर्माण झाली, हे तुला माहित आहेच. अनेक आधुनिक शास्त्रज्ञांनी ते सिद्ध केलेले आहे आणि तो आपला उद्देश नाही.

जर जीव म्हणजेच देहाला मी म्हणणारी स्फुर्णा 'मी परब्रह्मच आहे' असा विचार



घेऊनच उठली असती तर सद्‌गुरूदेवांची गरजच राहिली नसती. पण असे घडत नाही. जीवाला आपल्या ब्रह्मत्त्वाचा बोध देण्यासाठी सद्‌गुरुदेवांची गरज भासते. अशाप्रकारे सद्‌गुरुदेवांना शरण येतेवेळी जीवाजवळ स्थूळ, सूक्ष्म आणि कारणदेह असे तीन देह असतात. **सद्‌गुरुदेव ज्ञानप्रकाश देतात** तेव्हा **महाकारण देह त्यांच्या हाती दिल्या जातो** आणि त्यामुळे **तो शहाणा होतो** म्हणजे **ज्ञातृ होतो.** शिष्याने काय करावे? तर स्थूळ देह नशिबावर सोडून द्यावा आणि सूक्ष्म देहाने पूर्वी सांगितल्याप्रमाणे **सदाचरण** ठेवावे. या मार्गाला लागल्यानंतर तरी त्याने षट्साधन संपन्नता प्राप्त करून घ्यावी. पण सर्वसाधारणपणे काय होते की सर्वसामान्य जीवाला ऐहिक आणि पारलौकिक सुखांची लालसा असते. मृत्यूसमयी ऐहिक सुखांच्या 'गडद वासना (तृष्णा)' असलेला जीव वासनापूर्ती अभावी स्थूळ देह सोडून सूक्ष्मदेह आणि वासनांसह जाऊ लागतो आणि स्थूळदेहा अभावी वायूरूपात भूत बनतो. पारलौकिक सुख वासना असलेले जीव मृत्यूनंतर सूक्ष्मदेहासह देवता बनतात. भूते वाईट म्हटल्या गेली. कारण ती आपल्याला त्रास देतात तर देवता चांगल्या म्हटल्या गेल्या कारण ऐहिक सुखप्राप्तीमध्ये त्या आपल्याला मदत करतात. यांनाच देवयोनी आणि भूतयोनी म्हटल्या गेले. ते सर्व हिरण्यगर्भात सूक्ष्म वायूरूपाने रहातात. आता तुझा जगतासंबंधीचा प्रश्न की, ते दिसतेच का? जग दिसते कारण ते असते. पण आपण एवढीच गोष्ट लक्षात ठेवायची की ही विश्वरचना **मीच माझा आनंद अनुभवण्यासाठी** झाली आहे. हे दुसरे **काही नाही तर परब्रह्मच आहे.** जीवत्त्वास आलेले परब्रह्म जेव्हा त्याला स्वतःला स्थूळ देहाच्या मर्यादेत ठेवते तेव्हा स्थूळ देहाच्या कार्यशक्ती मर्यादित असल्यामुळे सर्व आनंद देहद्वारेच प्राप्त करून घेताना अनेक प्रकारचे मानसिक ताणतणाव उद्‌भवतात. आता मला असे वाटते जगन्निर्मिती आणि ईश्वर यासंबंधीचे तुझे सगळे प्रश्न सुटले असावेत.

**शिष्य-** होय महाराज, नक्कीच माझे प्रश्न सुटले आहेत.

मला समजले विश्वात आढळणारा एकन् एक पदार्थ मूळ ब्रह्मरूपच आहे, दैनंदिन जीवनात ओळखीसाठी आपण विविध पदार्थांना विविध प्रकारांनी विविध नावे दिली तरीही! मी समजलो, मूलाज्ञान किंवा मूळमाया अर्थात् विश्वसंरचनेचा नियंत्रक अधिकारी म्हणजेच ईश्वर याने विश्वाची निर्मिती केली. अशाप्रकारे विश्वाच्या उत्पत्ति-स्थिती-लयाचा नियंता ईश्वरच आहे. पण या निर्मितीत (किंवा स्थितीपालनात किंवा संहारात) परब्रह्माची काय भूमिका आहे? का?

**सद्गुरु** - लक्षपूर्वक ऐक माझ्या लाडक्या! या विधानाची आठवण ठेव की, **'येथे ईश्वर क्षणभरासाठी थांबला आणि परब्रह्माने ते धारण केले.'** आणि हे असे रचनेच्या प्रत्येक टप्प्यात घडले. याचा अर्थ असा होतो की परब्रह्मीच्या स्थिरत्त्वाने तो टप्पा अस्तित्वात आल्यासारखा भासू लागला. परब्रह्माने पकड सोडून देताच तो -तो टप्पा नाश पावतो. उदाहरणार्थ कुठल्याही स्थूळ देहातील जीव मृत्यूसमयी जेव्हा भौतिक देह सोडून देतो, तेव्हा भौतिक पदार्थ क्षरतात आणि विश्वातील इतर कोणत्यातरी रूपाकारात विरून जातात. अशाप्रकारे प्रत्येक टप्प्यामध्ये परब्रह्मींचा दैवी स्पर्श आहेच आणि तोच सगळे काही करत असतो. ईश्वर जो की (विश्वाचा) नाममात्र रचविता आहे, त्याला उत्पत्ति-स्थिती-लयाचे श्रेय दिले जाते.

**शिष्य** - पण मग विश्व आता जसे आहे त्या स्थितीतच प्रत्येक वस्तुमात्रातील परब्रह्म मला कसे ओळखता येईल? विश्वातील प्रत्येक पदार्थातील परब्रह्मीचा भाव आणि मूलाज्ञाना चा (मायेचा) सहभाग मला वेगवेगळा कसा ओळखता येईल? वा सर्वांमध्ये 'ॐ' काराची भूमिका कोणती?

◈◈◈

मी देह नसून परब्रह्म आहे हे समजणे हे **'ज्ञान'**, सगळीकडे परब्रह्म पाहणे हा **'अभ्यास'** आहे, सतत परब्रह्म स्वरूपात राहून अनुभव घेणे हीच **'स्थिती'** होय.

**- श्रीसस भागीरथीनाथ**



# भक्तगाथा...✍

नोकरीस कायमचा राजीनामा दिल्यानंतर परमात्मप्राप्तीकरीता बलभीमाच्या चित्तात तळमळ उत्पन्न झाली व **'येचि देही येचि डोळा। पाहिन मुक्तिचा सोहळा।'** असा निश्चय त्याच्या मनाला झाला व तो सोहळा ज्या उपायाने भोगता येईल त्या उपायांचे शोधन सुरू झाले. गावात कोणी संत साधू आल्याचे कळल्यास त्यांच्या दर्शनास जाऊन तो विनयाने पारमार्थिक प्रश्न विचारी व थोडीशी चर्चाही करी. बलभीम बऱ्याच साधुपुरुषांस भेटला, पण त्याच्या मनाचे खरे समाधान कोठेच होईना! '''नाना-मतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला।' अशा स्थितीत उद्धार करणारा खरा सचोटीचा सत्पुरुष कोण व कसा मिळेल? प्रभो! धड प्रपंच ना परमार्थ अशी माझी स्थिती आहे. दीनदयाळ पांडुरंगा! माझे अनेक दोष पोटी घालून पदरात घ्या.'' याप्रमाणे प्रभूची मनःपूर्वक प्रार्थना करून कित्येक वेळेस बलभीम रडे व उदासीन होई.

एका दृष्टीने त्यास असेही वाटे की मी आता निःसंग मोकळा झालो. प्रपंचाची भिती राहिलीच नाही. आपत्तीचे डोंगर कोसळले हे एक प्रकारे बरे झाले. ''बरे झाले देवा! निघाले दिवाळे। बरी या दुष्काळे पीडा केली।। अनुतापे तुझे राहिले चिंतन। झाला हा वमन संसार।।'' या श्री तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे बलभीमास समाधान वाटू लागले व संसारातील विपत्तीमुळे परमात्मदर्शनाची लालसा त्याच्या चित्तात वाढली.

**अभंग** *कोणाच्या धावण्या धावले श्रीपती। म्हणोनिया गुंती पडलीसे।।*
*इतर ते भक्त असती पवित्र। सावत्र अपवित्र मी का झालो?।।*
*काय माझे पूर्व दोष आड येती। म्हणोनी श्रीपती विसरलेति।।*
*वेडियाचा आठव धरोनिया मनी। येई चक्रपाणी झडकरी।।''*

याप्रमाणे नित्य बलभीम पांडुरंगाची प्रार्थना करी. बलभीमाने नाना प्रकारची ध्यान धारणादिक साधने केली पण त्याच्या चित्ताची शांती होईना व काय करावे हे ही कळेना. मंदिरातील सर्व मंडळी निद्रिस्थ झाल्यावर बलभीम एकटाच उठे व मंदिरात रात्री २/३ वाजेपर्यंत कळकळीने प्रभूस आळवित असे.

**अभंग १** *अगा! पांडुरंगा। करितसे धावा। येई बा केशवा नारायणा!।।*
*कृष्ण, विष्णु, हरि, मुकुंद, मुरारी। धाव झडकरी कृपासिंधो।।*
*तुजविण जाणे कोण शीण भाग। सांगे जिवलग कोण आहे?।।*
*वेडा म्हणे देवा! तू माझी जननी। वोसंगा घेवोनी बुझवावे।।*

**अभंग २** *तुमचीये गावी अद्वैत राणीव। मज द्वैतभाव उपन्नला?।।*
*तुमचीये गावी प्रेमाचे भांडार। अप्रेम दारिद्र्य मजसी का?।।''*
*तुमचीये गावी दयेचा सागर। निर्दय तृषित मी का झालो?।।*
*वेडा म्हणवितो तुमचा निजदास। नका जी उदास होऊ मनी।।*

वरील अभंगावरून बलभीमास परमात्म दर्शनाची किती तळमळ रात्रंदिवस लागली होती हे स्पष्ट दिसून येईल. 'देहं वा पातयेत्। अर्थ वा साधयेत्।।' असा निश्चय बलभीमाचा झाला होता. जागृतीत, स्वप्नात व सुषुप्तीत पांडुरंगाच्या भजनावाचून त्यास दुसरा विषयच उरला नव्हता. आपल्या ध्येयप्राप्तीसाठी जोपर्यंत मनुष्य वेडा होत नाही तोपर्यंत त्यास ते प्राप्त होत नाही. पुष्कळ लोक पारमार्थिक ध्येय नुसते डोळ्यापुढे ठेवतात. परंतु ते प्राप्त करून घेण्यासाठी साधनांचा अवलंब करीत नाहीत. आजपर्यंत जे मोठे मोठे संत, साधू, महात्मे होऊन गेले त्यांची चरित्रे पाहिल्यास असे आढळते की, त्या सर्वांनी आपल्या ध्येयप्राप्तीसाठी सर्वस्वाचा त्याग केला व शेवटी ते प्राणही त्यागण्यास तयार झाले, म्हणूनच त्यांना थोरपण प्राप्त झाले.

बलभीम असाच प्रभुपायी वेडा झाला होता. परमात्मविरहाने तो कधी रडे, कधी परमात्मलीला गाऊन तो हसे, कधी सर्वास साष्टांग नमस्कार घाली, कधी पायात चाळ बांधून भजनांनदे नाचे, कधी काकूळतीने प्रभूस हाक मारी. बलभीमास जो कोणी पाही त्याला त्याच्या विषयी आदर व प्रेम वाटत असे, इतकी त्याची वृत्ति सात्त्विक बनली होती. पत्रावळीवाले यांच्या मंदिरातील मालकीण राधाबाई हिचे व इतर भजन प्रेमी मंडळीचे बलभीमावर फारच प्रेम जडले. हा महान भगवद्भक्त आहे असे समजून त्यास 'बाबा अथवा बोवा' या नावाने संबोधू लागले. आता आपणही यापुढे आपल्या चरित्रनायकाचा उल्लेख 'बलभीमबोवा' या नावानेच करू.

(क्रमश :)



# गोजिरवाणी...✍

- **सौ. नीता कुलकर्णी**

**आजी-** अरे, तुमच्यापैकी 'क्रिकेटवेडे' कोण कोण आहेत?

**मुले-** आम्ही सर्व जण आजी!

**आजी-** मग तर तुम्हाला आजची गोष्ट नक्कीच आवडेल. आज मी तुम्हाला चिंटु नावाच्या एका मुलाची गोष्ट सांगणार आहे.

**मुले-** सांग ना आजी!

**आजी-** अरे, या चिंटुला क्रिकेटचे भारी वेड! तो सतत टी.व्ही. वर क्रिकेटच्या मॅचेस पहात रहायचा! सर्व खेळाडुंचे विक्रम याला तोंडपाठ! अरे एखादी मॅच सिरीज किंवा वर्ल्ड कपच्या वेळेस तर हा आपले वेळापत्रक त्याप्रमाणे आखायचा!

**मुले** - हो?

**आजी** - अरे, हा डोळ्यात तेल घालून मॅचेस पहायचा! पहाताना तहान-भूक हरवून बसायचा! त्याला जणू तो स्वतःच खेळतोय असे वाटायचे. सचिन त्याचा आवडता खेळाडू! त्याने कमी धावा काढल्या की हा खट्टू व्हायचा!

**मुले** - पण आजी, आमचेही तसेच होते.

**आजी** - अरे, काही मर्यादेपर्यंत खेळात रस घेणे ठीक! पण याचा मात्र अतिरेक व्हायचा! झालेल्या जुन्या मॅचेसही हा पहात रहायचा! व्हायचा तोच परिणाम झाला. चिंटु परिक्षेत काठावर पास झाला व त्याच्या डोळ्यावर जाड भिंगाचा चष्मा दिसू लागला. शरीरयष्टीही वयानुरूप नव्हतीच! किरकोळच होती.

**मुले** - मग, रागावले का त्याचे आईबाबा?

**आजी-** नाही. त्याच्या बाबांना त्याचा खेळण्याचा नाद लक्षात आला. पण यावर तोडगा काय काढायचा? त्यांनी एक युक्ती केली. त्याचे नाव सुट्टीतील क्रिकेटच्या प्रशिक्षण वर्गात घातले. तिथले प्रशिक्षक त्याच्याकडून मैदानावर भरपूर मेहनत करवून घेऊ लागले. वेगवेगळे व्यायाम प्रकारही तो शिकला. तीन-चार तास मैदानावर खेळल्यावर

**पान नं. १७ वर**

# अहो ऐकलंत का?...✍

**- सौ. मेघा**

## गुरुपौर्णिमा उत्सव

गुरुपौर्णिमेचा संपूर्ण उत्सव मंदिरात राहून गुरुदेवांनी पूर्ण करवून घेतला, त्यामुळे समजले की संपूर्ण उत्सव मंदिरात राहाणे म्हणजे काय आनंद असतो.

बोलवण्याच्या कथेपासून उत्सव सुरु झाला आणि काल्याला उत्सवाची सांगता झाली. हे दिवस इतके लवकर सरले की समजलेच नाही.

गुरुदेवांनी संपूर्ण दिवसाचा भरगच्च कार्यक्रम आखला होता. सकाळी ६ वाजता काकडा, ७ वाजता अतुलची पोथी, ११ वाजता गुरुदेवांची पोथी, ४ वाजता भजन, ५ वाजता कथा, मग टिपऱ्या आणि रात्री ब्रह्मात्मबोध नाटक.

उत्सवात ज्ञानाच्या सात पायऱ्या सांगितल्या. सकाळी अतुलच्या पोथीपासून सुरुवात व्हायची. तोच विषय दिवसभर वेगवेगळ्या पद्धतीने घेतला गेला. अतुलची पोथी चांगली रंगत असे. दोन तास कसे निघून जात ते कळत नसे. गुरुदेवांची पोथी म्हणजे काय ते सांगायलाच नको. छोट्या मैत्रेयीला हाताशी धरून गुरुदेव असे काही नाटक उभे करून विषय समजावून देत की ते सांगायला शब्द नाहीत. चित्त शांत झाल्याचा अनुभव आला. माऊली कडून जे प्रेम मिळत असते त्याला तोड नाही ह्याचा अनुभव आपण सगळ्यांनीच अनेक वेळा घेतला आहे.

माईंच्या आणि सुलभा काकूंच्या हाताखाली स्वयंपाकात मदत करणे हा अनुभव खूप आनंद देऊन गेला, तसेच खूप काही शिकवून ही गेला.

रोज टिपऱ्या खेळताना मजा यायची. नाटक ही छान रंगायचे.

संपूर्ण उत्सवाचा कळस म्हणजे काल्याचा दिवस होता. सकाळी बाळकृष्णाच्या लीला अप्रतिमच होत्या. गुरुदेवांभोवती नाच करताना भान हरपून गेले होते. खरं तर खूप काही सांगायचे आहे, पण शब्दात मांडताच येत नाही आहे. काय अनुभवले हे सांगण्यासाठी परत गुरुदेवांच्या शब्दांचाच आधार घ्यायला लागतो, ते म्हणजे ''**कोकरू आईला भेटलं**!''

◈◈◈



# विकारांकडून निर्विकाराकडे...✍

**- मुक्ता**

## वाटचाल सरली ना?

विकारांना मागे टाकीत आपण आता अंतिम टप्प्यात पोहोचलो आहोत. मागील लेखात आपण आशा आणि मनिषांचा समाचार घेतला. या लेखात आपण कल्पना, इच्छा, वासना व तृष्णा यांना उपटून टाकुया!

शेंगा सोलताना आपण आधी कडक टरफले फोडून फेकतो, तरीही शेंगदाण्याला स्वतःचे असे साल असतेच. परंतू तेही दाणा भाजल्यावर निघून जाऊ शकते. तसेच काहीसे या वासनांचा समाचार घेणे आहे. षड्रिपू किंवा षड्उर्मी या भुईमुगाच्या टणक टरफलासारख्या जाणवतात व त्यांचा निकाल आपण प्रयत्नपूर्वक लावू शकतो. परंतु या षड्वासना मात्र त्याहून सूक्ष्म आहेत व दाण्याच्या सालाप्रमाणे भाजल्याशिवाय निघत नाहीत. त्यामात्र गुरुदेवांच्या ज्ञानाच्या आचेवरच भाजाव्या लागतात व काढाव्या लागतात.

लहान मुले परिकथांमध्ये रमतात. त्यांना ती दुनिया खरी वाटते. तसेच मोठी माणसे **कल्पनेने** जग उभे करतात. तरूण पिढीला सिनेमातील नायकनायिका आपला जोडीदार असावा असे वाटते. कारण त्या **कल्पना** राज्यात राहिल्याने त्यांना तशा इच्छाही निर्माण होऊ लागतात. 'परिकथेतील राजकुमारा...' या गाण्याप्रमाणे त्यांची अवस्था होते.

**इच्छा** ही मनुष्याला देहभोगार्थ जरूरी असते. लहान मुलाला शरीरात कॅल्शिअमच्या अभावी खडू, माती खाण्याची इच्छा होते. मांजरी आपले पोट बिघडल्यावर दूर्वा खाऊन उपचार करून घेते. आपल्यालाही पोट बिघडल्यावर जेवण्याची इच्छा होत नाही. कारण उपवासाने आपले पोट पूर्ववत होते. ही निसर्ग योजनाच आहे. तशीच **इच्छा** मनुष्यास होत असते. ही झाली स्थूळ देहाच्या मेन्टेनन्ससाठी आवश्यक असणारी **इच्छा!**

या इच्छेतूनच **वासनेचा** जन्म होतो. इच्छेची गडद अवस्था म्हणजे **वासना** होय! मनुष्य त्यासाठी बेचैन होतो. लहानमुले जसा हट्ट धरतात तसेच! अनेक व्यक्ती गैरमार्गाने पैसा मिळवतात व या वासनांची पूर्ती करतात. घरात हव्या त्या वस्तू आणतात. ही **वासना** मुनष्याला स्वस्थ बसूच देत नाही. ती त्याला वाईट कृत्ये

करावयास भाग पाडते. खाण्याची वासना अतिरेकी होण्याने आरोग्याची संपदा मिळत नाही. तसेच इतर विषयांचेही आहे.

आता या वासनेचीही पुढची पायरी म्हणजे **तृष्णा**! ही तर त्या व्यक्तिला वेडीपीशी करते. एखादे वेळेस भूक सहन करता येते. पण तहान मात्र पाणी प्यायल्याशिवाय शमतच नाही. तशीच ही **तृष्णा** आहे. हिच्यामुळे माणूस रसातळाला जातो. समाजात होणारे बलात्कार हे या तृष्णेचेच रूप आहे.

आपण कल्पना, इच्छा, वासना, तृष्णा याबद्दल जाणून तर घेतले. पण त्यांची हकालपट्टी कशी करायची? जसे लगोरीच्या खेळात खालच्या लगोरीच्या आधारावर वरची व त्याच्या आधारावर त्यावरची लगोरी असते. तसेच काहीसे या वासनांचे आहे. या एकमेकींचा आधार घेऊन उभ्या राहतात. लगोरीच्या खेळात ज्याप्रमाणे सर्वात खालच्या लगोरीला चेंडू मारला की वरची उतरंड पडून जाते. त्याप्रमाणे महाराज सांगतात की देह हीच कल्पना आहे, जीवाने निर्माण केलेली! महाराजांच्या शब्दाचे बाण ही कल्पनाच बाजूला करतात, त्यामुळे साहजिकच इतर वासना गळून पडतात. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे **'मी देह'** हाच भ्रम जर आपण दूर केला तर इतर वासना आपल्यावर राज्य करतीलच कशा? **हेच ज्ञानाच्या आचेवर भाजणे!** ज्यामुळे दाण्याच्या वरच्या सालाप्रमाणे वासनांची साले गळून पडतात. जसे भाजलेला दाणा हा कधीच कडवट होत नाही. तसेच ज्ञानाच्या आचेवर भाजल्यावर जीवनात कटुत्व येत नाही, जीवन विकारले जात नाही.

आपल्या आत विकार उठतच असतात. तेव्हा आपण सैरभैर होतो व त्यांच्याशी एकरूप व्हायला लागतो. या लेखमालेचा हेतू हाच होता की आपण विकारांशी एकरूप न होता त्यांना ओळखायला शिकायचे! त्यांना बाजूला करायचे! जसे एखाद्या रोगाच्या लक्षणांवरून तो ओळखायचा व मग उपाययोजना करायची! जंगलात प्रवास करताना श्वापदे येतात तसे हे विकार आपल्या अंतर्गत प्रवासात उभे ठाकतात. त्यांचा नायनाट महाराज श्रवणातून शब्द बाणांनी करीतच असतात. परंतु आपण एकटे असतानाही जेव्हा हे निर्माण होतात तेव्हा त्यांना ओळखून महाराजांचे शब्द आठवून त्यांचा नाश आपल्याला करायचा आहे. **'निर्विकाराकडे'**, वाटचाल करणाऱ्या सर्वांना लेखमालेचा हा **'शुभेच्छारूपी पुष्पगुच्छ'** आवडला असेलच!

◈◈◈



# निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे...✍

**- आकांक्षा**

काल रात्री मंदिरात नाटक करून आले. पण कालचा आनंद आजही आहे. मंदिरात जाण्याची काही वेगळीच मजा असते. ते नाटकातले प्रकरण आठवूनही मजा येते आणि काहीही काम करताना हसू फुटते. काय आनंद आहे! काय मजा आहे! जाऊनच अनुभवावे. म्हणून सहज मनात येते. आज हे मंदिर आणि गुरुदेव भेटले नसते तर ही मजा आली असती? आपण म्हणतो की 'निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे!' पण त्या निर्गुणाची तरी काय मजा जर सगुणच नसेल तर? आपण गुरुमाऊलीचे बाळ बनावे. मग जी भीती होती ती दूर पळून गेली. **गुरुदेव नसते तर काहीच झाले नसते!** काय कृपा आहे त्या माऊलीची की आपण कसे आहोत, काय आहोत याच्याकडे लक्ष न देता इतक्या प्रेमाने जवळ घेते की तिला आपण दिलेले घाव कधी घातलेच नाहीत. आपण खरचं बाळ आहोत आणि बाळाप्रमाणे हट्टी देखील की तिने प्रेमाने साद घालावी आणि आपण लक्ष देऊ नये! कशी झाली ही दुर्बद्धी? **त्या प्रल्हादाच्या गोष्टीमधले शंड्:ढामर्क ठरलो!** काय मुर्ख आपण! खरंच असं वाटतं की तिने आमच्यावर केलेले उपकार कसे फेडू? आताच वाढदिवसाचा उत्सव झाला. त्यात गुरुमाऊलीचे सर्व वर्णन आले होते. जसे कथेत वर्णन आले होते तसेच वाटते. आपल्याच प्रारब्धाचा हेवा वाटू लागला आहे. असं वाटतं बरं झालं, आई तरी कथेला जात होती त्यामुळे काही ना काही ऐकायला मिळत होतं. एवढा विचार करून डोळ्यात सहज पाणी येतं आणि त्याला थांबवूही शकत नाही. **'सगुण चंद्राचे मुख देखियेले, सुख सिंधुसी भरते बहु आले...'**

◈◈◈

# हे गुपित कुणाला सांगु कसे?✍

**- अनामिका**

आज दुपारी टी.व्ही. पाहत असताना एका सिनेमाचे गाणे दाखवत होते. पिक्चरचे नाव 'कभी अलविदा ना कहना' होते. त्यात 'मितवा' हे गाणे लागले होते. त्याचे बोल ऐकले आणि मी थक्क झाले. लगेच गुरुदेवांच्या शिकवणीची आठवण झाली. त्या गाण्याचे बोल असे होते.

मेरे मन ये बता दे तू। किस मोड चला है तू।
क्या पाया नही तूने, क्या ढूँढ रहा है तू?
जो है अनकही, जो है अनसूनी वो बात क्या है बता।
मितवा कहे धडकने तुझसे क्या?
मितवा ये खुदसे तो ना तू छूपा ।।धृ।।
जीवन डगर में, प्रेम नगर में आया नजर में जब से कोई है।
तू सोचता है, तू पूछता है जिसकी कमी थी क्या ये वो ही है?
हाँ ये वोही है, तू एक प्यासा और ये नदी है।
काहे नही इसको तू खुलके बताएँ।
जो है अनकही...

हे ऐकले आणि मला सगळी शिकवण आठवली. खरचं गुरुदेव आपल्याला प्रत्यक्षात असेच विचारतात की, 'अरे, तू कुठे भरकटतो आहेस? हे तुझे काय चालले आहे? काय शोधत चालला आहेस?' आपण व्यवहारात गुंततो व त्यामुळे आपण स्वरूपाला विसरतो. मग महाराज अशी **'अनकही, अनसुनी'** अर्थात् लोकांना माहित नसलेली ब्रह्मतत्त्वाची गुपिते सांगतात. एवढं करूनही जेव्हा आपण विसरतो तेव्हा ते सांगतात, ''अरे, तुला माहित आहे. तू लपवू नकोस. तू स्वरूपाला झाकू नकोस. जरा हृदयातला प्रत्यक ठोक्याचा आवाज नीट ऐक. तिथेही तुला '**ब्रह्म मी**' हे ऐकू येईल.''

महाराज आपल्याला किती किती समजावून सांगतात व आपण परत परत विसरतो. खरचं महाराज एवढे महान आहेत जे आपल्याला सांगून कधीही थकत नाहीत. ती सद्गुरुमाऊली आहे. खरंतर गुरुदेवांनीच हे अनुभवास आणले. म्हणूनच शेवटी म्हणावेसे वाटते -

**'सद्गुरूनाथ महाराज की जय'**



# गुंजारव - १

**- अदिती**

आज गोराई अंगणी सण भारी। माधुरी रूपाने अवतरला श्रीहरी ।।धृ।।
बोध सरींनी न्हाऊ घातले सर्वा। हा मी नाही, हा मी नाही ठसविले बरवा।
मेळवूनी घेतले आपणात सर्वा। दुजा नाही एकी एक आहेसी तरी।।१।।
महाकारण वस्त्र देऊनी प्रबोध मांडिला। पिंड ब्रह्मांड टाकुनी स्वयेची धुंडिला।।२।।
तो पहा तो पहा, ठायी ठायी ओंकार नटला। एकलाच तोच तो आहे मुरारी।।२।।
नीजरंग अनंगरंग रास रंगला। रंगी रंग रंगातीत श्रीरंग दंगला।
रंगवूनी रंगुनी रंग उधळिला। अदिती श्रीमाधुरी नीजरंगारी ।।३।।

# गुंजारव - २

**- अपर्णा**

येताच गुरुमंदिरी देहभान विसरले।
कधी न घडावे असे मी न माझी राहिले।।
मी म्हणजे सर्व काही, माझ्याशिवाय काहीच नाही।
होते अशा भ्रमात, पण आता मी न माझी राहिले।।१।।
पन्नासाव्या वाढदिवशी अचानक भेट झाली।
भेट कसली ती तर फक्त नजरेची ओळख झाली।।२।।
वाढदिवस उत्सव संपून परत बोलावणे आले।
बोधरूपी जन्म घेऊनी सच्चिदानंद झाले।।३।।
तरीही मन नव्हते पूर्ण शांत, जवळीक काही नव्हती।
त्यांनीच काढला मार्ग त्यावर, कॅफे, फार्म खेळवून कॉम्प्युटरवरती।।४।।
त्यामधुनी दाखविला वेदांत सारा, मी भारावले।
देहाला चिकटून बसणारी मी न माझी राहिले।।५।।
आईची माया प्रेम सर्व काही मिळाले।
वंचित होते ज्या सुखापासून, ते मिळाले, अन् मी न माझी राहिले।।६।।

उदराने नाही तर ओठातून मला जन्म दिला।
काय असेल पुण्य पूर्वजन्मीचे, पुनर्जन्म मिळाला।।७।।
माऊलीच्या वाढदिवशी वाढ झाली अपर्णाची।
न्हाऊन गेले पूर्ण, नेहमी आस लागेल अशा प्रेमाची।।८।।
साथ जशी ही सुरु जाहली अखंड तशीच राहू देत।
अपर्णाला पूर्णपणे माधुरीमध्ये मिसळून जाऊ देत।।९।।

◈◈◈

**पान नं. १० वरून**

चिंटू खूप दमून जाऊ लागला. घरी आला की भरपूर खाऊन झोपून जाऊ लागला.

**मुले-** मग पुढे काय झाले?

**आजी-** मग काय चिंटुला टी.व्ही. बघायला अजिबात वेळ मिळेनासा झाला. खेळण्यामुळे त्याचे शरीर तर सुदृढ दिसू लागलेच, पण तो आनंदीही दिसू लागला. मग हळूहळू चिंटुला सर्व क्रिकेट खेळाडू करीत असलेल्या मेहनतीची कल्पना येऊ लागली. त्यांनी आज मिळवलेले यश हे त्यांच्या मेहनतीचे फळ आहे हे कळून चुकले तसेच चांगले क्रिकेट खेळणे किती अवघड आहे हेही उमजले.

**मुले -** मग तो सुधारला का?

**आजी-** अरे टी.व्ही. वरच्या मॅचेसच्या जगात रमणे किती चुकीचे आहे हे त्याला समजले. नुसते कल्पनेच्या दुनियेत रमणे हे किती धोकादायक आहे हे त्याच्या बाबांनी त्याला समजावून सांगितले.

**मुले -** खरचं आजी, कृती करणे अधिक चांगले ना!

**आजी -** बरोबर! अरे म्हणतातच  ना 'खयालोंके पुलावसे पेट नही भरता!'' बरं का मुलांनो, तुम्ही तुमच्या वयाचा फायदा घेऊन खूप मेहनत केली पाहिजे. स्वप्नातल्या गोष्टी सत्यात येण्यास प्रयत्नच हवेत! 'प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे' हेच खरे.

◈◈◈



# उत्सव विशेष...✍

## गुरुपौर्णिमा उत्सव

**दि. ७ जुलै ते १६ जुलै २०११**

**मूळपद**

*वाहवा! वैभव ज्ञानाचे । वर्णन कोण करील त्याचे ।।धृ।।*
*ज्ञानापूर्वी शास्त्राची तरी भीती होती तुजला।*
*ती ही जाऊनि विषय भोगण्या देह तुझा हा सजला।।१।।*
*'ज्ञानदेव तु कैवल्यं' ही श्रुति घेऊन तू बससी।*
*परि ज्ञानाचा खरा अर्थ तू चित्ती कधी नाणीसी।।२।।*
*तत्त्व जाणुनी चित्तातुनी जरी विषय लोभ नच गेला।*
*तरी सांग मग भेद काय तो कुतऱ्याला आणि तुजला।।३।।*
*केळी खारका मिळती म्हणूनी एकादशी शिशु करीती।*
*तशी तुझी ही विषय लंपटा वेदांताची रीती।।४।।*
*काम क्रोधा जिंकुनी आदि पूर्ण ज्ञानी व्हावे।*
*भवसागर हा तरुनी आपण जगता उद्धरावे।।५।।*
*राज पदावर बैसुनी बापा भिक्षा का मागावी।*
*शम दम साधुनी मोक्ष संपदा पूर्णपणे भोगावी।।६।।*
*बोध अशापरी सद्गुरूनी जो कृपादृष्टिने केला।*
*तोची सांगतो हस्त जोडूनी कृष्णसुनू मित्राला।।७।।*

## स. स. भागीरथीनाथ जयंती उत्सव

**२३ जुलै ते ३० जुलै २०११**

**मूळपद**

*भागिरथी गुरुमूर्ती। आदीशक्ती भगवती।।१।।*
*मुमुक्षुसी उपदेशी। तू ब्रह्मास्मी निश्चयेसी।।२।।*
*तूं शाश्वत ज्ञानानंत। भगवंत सदोदीत।।३।।*

## संपादकीय...✍

गुरुदेवांच्या ज्ञानाची महतीच अशी आहे की ते साध्या भोळ्या निरक्षर भाविकाला तर संतोषवतेच पण शिक्षणाच्या चक्रातून फिरलेल्या, बुद्धीला 'मी' म्हणणाऱ्या बुद्धीवादी जीवानांही शास्त्रोक्त शिक्षण देऊन, त्यांना संशयाच्या फेऱ्यात न अडकविता ज्ञानाचे धडे गिरवायला लावते. बुद्धीच्या कसाला प्रत्येकच गोष्ट तपासून पहाण्याची जी सवय शिक्षणाने प्राप्त होते, तेथेही त्यांना त्याच भाषेत वेदांत कसा शिकवावा हे माऊलीच जाणे! याचा अनुभव प्रत्येकालाच **'सदाचरण'**चा लेख वाचताना येईल. अत्यंत सुसूत्रेतेने ज्ञानाची एक एक पायरी माऊली आपल्याला कशी चढवते हेच जाणवते.

अशा पायऱ्या चढताना आपण ठेचकाळतो. कारण आपले विकार मध्ये येतात. **'विकारातून निर्विकाराकडे'** या लेखमालेची सांगता या अंकात होत आहे. त्याचा फायदा साधकांना झाला असेल ही अपेक्षा आहे.

माऊलीच्या बाळांना वयाचे बंधन नसते हे तर आपण जाणतोच! परंतू तरीही लहान वयात वेदांत जाणण्यास उत्सुक असलेल्यांचे कौतुक हे वाटतेच. त्यांचे बोल ऐकण्यास गोडही वाटते. त्याचाच प्रत्यय **'तरुणाई'**, **'गुंजारव - २'** व **'हे गुपित कुणाला सांगु कसे?'** वाचताना येतो. प्रौढांनाही आईला बिलगण्याचा आनंद माऊली कशी देते हे **'अहो ऐकलत का?'** मध्ये जाणवते.

माऊलीबरोबर वाटचाल करणारे सर्व साधक आनंदयात्री राहोत हीच गुरुचरणी प्रार्थना!

### श्रीसस बलभीम महाराज पुण्यतिथी उत्सव

पान नं. १९ वरून

**२० सप्टें ते २४ सप्टें २०११**

**मूळपद**

*निवृत्ती गंगेत बुडी मी घेतली। निवांत लाधली स्थिती मज।।१।।*
*बाहेर भीतर काया हे लोपली। निराकार झाली हे जलरूप।।२।।*
*मन बुद्धी वृत्ती लयाते पावले। निरामय झाले आपेआप।।३।।*
*अहं सोहं दोन्ही ठायीच मुराले। समरस झाले ब्रह्मजळी।।४।।*
*जीवनी जीवन मिळता मिळणी। शब्दाची कहाणी आटोपली।।५।।*
*सुदशा दुर्दशा जाहली समाप्ती। दत्ता भागिरथी सुख सिंधु।।६।।*



*जीव शीव येतो वाव। सदाशिव स्वयंमेव।।४।।*
*वारंवार सुविचार। बोधीसार निरंतर।।५।।*
*दत्त लक्ष्य तू अध्यक्ष। अपरोक्ष, नको साक्ष।।६।।*

### स. स. माधुरीनाथ महाराज वाढदिवस उत्सव

**५ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०११**

**मूळपद**

*भागिरथी गुरु आई, तुझे उदरी आलो पाही।।१।।*
*आता लावू नको वेळ, घ्यावे वोसंगा हा बाळ।।२।।*
*प्रेम पान्हा देई माते, कुरवाळावे बोध हस्ते।।*
*द्वैताद्वैत अंकावरी, घेई मज निरंतरी।।३।।*
*आपुले पदराखाली झाक, दूर करी काळ धाक।।४।।*
*गोड गोड ते बोलावे, मुख सदा दाखवावे।।५।।*
*तुझे दर्शन स्पर्शन, घडो मज अनुदिन।।६।।*
*दत्त म्हणे मी तान्हुला, इतुका पुरवावा लळा।।७।।*

### गोकुळाष्टमी उत्सव - २०११

**१४ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०११**

**मूळपद**

*शांती कांबळी पांघरे गाई चारी वो।अंग संगे भुलवी ब्रज नारी वो।।धृ.।।*
*पैल उभा सावळा गोपीनाथु वो। वृंदावनी निर्मळ पावा वाजवीतु वो।।१।।*
*गुणातीत सगुण वेषधारी वो। गोपाळांसी खेळे यमुनातीरी वो।।२।।*
*नारायण सकळ सुखदायक वो। ह्रतपंकजी दीपक जगन्नायक वो।।३।।*
*पीतवसन सुंदर श्याम नेसला वो। पूर्णकाम पाहता शिव तोषला वो।।४।।*
*मुकुटकुंडल कस्तुरी माथा रेखिली वो। उदरी वनमाला सर्वांगी मिरविली वो।।५।।*
*दीनानाथ केशवराज स्वामी। भावे चरणी घातली मिठी आम्ही वो।।६।।*

पान नं. २ वर

BOOK-POST

To,

## संस्थेतील
## प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१ दि. १३ जाने ते २० जाने. २०११

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. २८ फेब्रु. ते २ मार्च २०११

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. १६ मार्च ते २४ मार्च २०११

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १४ दि. १२ मे ते १८ मे २०११

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५ दि. ७ जुलै ते १६ जुलै २०११

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. ५ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०११

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. ३ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०११

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२